सी.बी.टी प्रकाशन

# प्राणिसंग्रहाल याचा न्हावी बदलू सिंग



BVBK-0402785

# प्राणिसंग्रहाल याचा न्हावी बदलू सिंग


लेखिका : प्रतिभा नाथ

चित्रांकन : जगदीश जोशी

अनुवाद : अलका साने





BVBK-0402785

बदलू सिंग एक न्हावी होता. परंतु तो काही साधारण न्हावी थोडाच होता ? प्राणिसंग्रहालयातील जनावरांचे केस कापायचा तो!


बदलू सिंग सर्वांना माहित होता. बदलू सिंग गिड्डा आणि जाडा होता. चेहरा वाटोळा आणि मोठ्या मिशा. बदलू सिंग आपल्याबराबरोबर नेहमी एक पत्र्याची लहान पेटी बाळगित असे. पेटीवर मोठ्या अक्षरात लिहिले होते —

**बदलू सिंग जोरदार**

**—— न्हावी-प्रमुख**

बदलू सिंग पेटीमध्ये तीन कंगवे ठेवायचा. लाल रंगाचा कंगवा मऊ केसांकरता असे. पिवळया रंगाचा कंगवा कडक केसांकरता आणि मोठा हिरवा कंगवा गुंतलेल्या केसांकरता होता. त्याच्याकडे कात्र्यासुध्दा तीन प्रकारच्या होत्या. एक मोठ्या पात्यांची, एक आखूड पात्याची व मिशा कापायला अगदी छोटी पाती असलेली.

शिवाय दोन टॉवेल त्याच्याकडे होते. मोठा टॉवेल मोठ्या प्राण्यांकरता लहान टॉवेल छोट्या प्राण्यांकरता.





मोठ्या टॉवेलवर निळ्या व पांढ-या रंगाचे पट्टे होते. तर लहान टॉवेलवर, गुलाबी रंगात लॉलीपॉप होती.

एकदा सकाळी सकाळी बदलू सिंग नेहमीप्रमाणे प्राणिसंग्रहालयात गेला. त्याच्या हातात पत्र्याची लहान पेटी होतीच. तो आज अगदी प्रसन्न होता. फाटकावरील चौकीदाराने त्याला आत घेतले.

अस्वलाच्या घरापासून बदलूने आपला फेरफटका सुरू केला. 'राम राम' तो अस्वलाला म्हणाला. ''राम राम, आज माझे केस कापायचा दिवस नाही.'' अस्वल म्हणाले. बदलू सिंगने आपल्या नोंदवहीत बघितले. ''तुझ्या हजामतीचा दिवस कसा नाही आज ? ''अरे दोन महिन्यात मी तुझे केस कापलेले नाहीत.'' तो म्हणाला, ''तुझं म्हणण खरं आहे.'' अस्वलाने मान डोलावली





''पण मला बघायला येणाऱ्या काही मुलांसारखे संध्या मी केस वाढवितो आहे.'' ''हरकत नाही, हरकत नाही.'' बदलू सिंग उत्तरला व पुढे


गेला. सश्यांच्या जागे समोरून तो जाऊ लागला. समोर बरीच लहान लहान झुडपं आणि झाडी होती. ससा मात्र त्याला एकही दिसेना. दोन कानांची एक अशा कानांच्या पाच जोड्या मात्र त्याला दिसल्या. तो हसला. ''तुम्हाला लपायची गरज नाही. आज तुमची केस कापायची पाळी नाही.'' तो असे म्हणता क्षणीच सर्व ससे उड्या मारीत बाहेर आले. बदलू सिंगला हसू आवरेना. तो तसाच जिराफाच्या घराकडे वळला.

CCLY
वा.वा.







जिराफ गुंतला होता चिंचेचा पाला खाण्यात. ''राम राम'' बदलू सिंग बोलला. ''राम राम'' जिराफानने उत्तर दिले. ''केस कापायचे ना ?'' ''हो, हो, जरूर.'' बदलू सिंग आत गेला. त्याने तिथली शिडी उचलून जिराफा जवळ लावली व वर चढला. त्याने आपली पत्र्याची पेटी उघडली मात्र, तेवढ्यात









जवळच्या झाडावर एक कावळा येऊन बसला. ''काव काव'' कावळा ओरडला. ''छोट्या, हत्तीच्या पिल्लाला हजामत करून पाहिजे.'' ''हत्तीच्या पिल्लाला केस आहेत कुठे ?'' बदलू सिंग म्हणाला. ''तरीसुध्दा तू यावं, असे त्याला वाटतं. ''कावळा म्हणाला. जिराफाची हजामत पुरी करून बदलू धावत पळत हत्तीच्या घराकडे गेला. हत्तीचे पिल्लू हुंदके देत रडत होते.

"ऊ......... ऊ......... ऊ.........शेजारच्या अस्वलासारखे मला सुध्दा केस कापून पाहिजेत." त्याची आई त्याला समजावत होती. बदलू सिंगने लॉलीपॉप चा टॉवेल काढला. आपला चष्मा लावून त्याने कामाला सुरवात केली. काळजीपूर्वक त्याने पिल्लाची शेपटी पकडली व गोंडयाचे केस कापले. त्याचे काम संपले तेव्हा हत्तीच्या पिल्लाने आपल्या सोंडेने, पत्र्याची पेटी उचलून बदलूला दिली. "धन्यवाद !" बदलू सिंगने त्याला थोपटत म्हटले. त्याने आपली पेटी घेतली व तो चिपान्झीच्या घराकडे वळला. चिम्पने त्याचे स्वागत केले.



म. धों. कर्वे, [illegible]
बाल वाङ्मय विभाग
क्र. २५८८ दिनांक ...
विषय आ.वा क. . ...



चिम्प खुर्चीत बसला होता. चेहेऱ्यावर हसू होतं त्याच्या. बदलू सिंगने त्याचे केस कापण्यास सुरवात केली. बदलूने क्षणभर नजर वळवली, तेवढ्यात चिम्पने आखूड पात्यांची कात्री घेतली व आपल्या पाठीमागे लपविली.



बदलू सिंग निघाला तेव्हा हातात कात्री पकडून चिम्प गुपचुप त्याच्या पाठीमागे गेला. बदलू सिंहाच्या घराकडे गेला. सिंह दाराकडे पाठ करून बसला होता. ''मी येऊ कां आत ?'' बदलू सिंगने विनयाने विचारले.






''ये आत.'' गुरगुरत सिंह म्हणला.'' पण फार वेळ घेऊ नकोस.'' ''एक क्षणभर.आत्ता उरकतो.'' बदलू सिंगने वचन दिले. दार उघडून तो आत गेला व पाठोपाठ चिम्पसुध्दा. बदलू सिंगने निळ्या व पांढ-या रंगाचा टॉवेल सिंहाभोवती गुंडाळला. हिरवा कंगवा व लांब पात्यांची कात्री काढून तो सिंहाची आयाळ कापू लागला. आखूड पात्यांची कात्री काढून चिम्प सिंहाची शेपटी कापू लागला. 'खट्–कट्' लांब कातरीचा आवाज येऊ लागला. 'धक्–धक्' बदलूच्या हृदयाचे ठोके ऐकू आले.






२६८५




'खट्–कट्' लहान कात्रीचा आवाज आला, ''काय मज्जा येतेय'' दात विचकून हसत चिम्प पुटपुटला व भराभर कापू लागला.

'खट्–कट् ! खटाक् – कट् ! खटाक्-खटाक ......... कट् !' आणि हे काय भयंकर ! त्याने सिंहाची थोडी शेपटीच कापली. चवताळलेल्या सिंहाने उंच उडी मारली.





टॉवेल काढून फाडला व बदलूच्या अंगाभोवती लपेटला. ''थांब, मीच आता तुझी हजामत करतो. ''तो गुरगुरला.'' बघच आता तू.'' त्याने कात्री हिसकावून, बदलूच्या चेहऱ्यासमोर नाचवली. बदलू भीती ने पांढराफटक पडला व पायांपासून डोक्यापर्यंत थरथर कापू लागला. चिम्प लक्षपूर्वक सर्व बघत होता. त्याला एकदम चांगली युक्ती सुचली. तो ओरडला, ''सिंहराज तुमची न्याहारी आली बघा.'' ''कोठे आहे ?''







सिहाने गर्जना केली. त्याला आता खूप भूक लागली होती. सिहाने आपल्याभोवती एक गिरकी घेतली. ती संधी साधून बदलू सिंग पिंजाऱ्याच्या बाहेर धांवला. चिम्पने सुध्दा धूम ठोकली.

बदलू सिंग अजूनही प्राणिसंग्रहालयात जातो. सिंहाची हजामत पण करतो. परंतु तो आपल्या कात्र्या काळजीपूर्वक आता सांभाळतो आणि सिहाची न्याहारी झाल्याशिवाय तो कधीही त्याचे केस कापत नाही

BVBK-0402785

चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट, नेहरु हाउस, 4 बहादुरशाह जफर मार्ग, नवी दिल्ली द्वारा प्रकाशित व ट्रस्ट च्या
इंद्रप्रस्थ प्रेस नवी दिल्ली मध्यें मुद्रित.